आज का आनंद
पुणे, गुरुवार, दि.२१ जानेवारी २०२१

# एमआईटी द्वारा वर्ल्ड हेल्थ पार्लियामेंट का आयोजन आज से

## एमआईटी स्कूल ऑफ फॉर्मेसी की अनूठी पहल : 10 सत्रों में स्वास्थ्य संबंधी चर्चा होगी

**नवी पेठ, 20 जनवरी (आ.प्र.)**

एमआईटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी के स्कूल ऑफ फॉर्मेसी पुणे द्वारा गुरुवार 21 जनवरी से वर्ल्ड हेल्थ पार्लियामेंट का आयोजन किया जा रहा है. ऑनलाइन होने वाली इस पार्लियामेंट में सार्वजनिक स्वास्थ्य सेवा, शिक्षा और रिसर्च आधारित विषयपर चर्चा की जाएगी. इस पार्लियामेंट का विषय स्वास्थ्य सेवा संस्था में उच्चस्तरीय सुधार (Pioneering Disruptive Reforms in Healthcare Ecosystem) है. यह जानकारी पत्रकार भवन में आयोजित पत्रकार-वार्ता में दी गई. इस अवसर पर महाराष्ट्र के टास्क फोर्स कोविड-19 के अध्यक्ष डॉ. संजय ओक, यूनिवर्सिटी केकुलगुरू डॉ. एन. टी. राव ऑनलाइन तथा प्र-कुलगुरु डॉ. मिलिंद पांडे, सलाहकार प्रा. डी.पी. आपटे, स्कूल ऑफ फार्मेसी के डीन डॉ. बी.एस. कुचेकर और एमआईटी स्कूल ऑफ गवर्नमेंट के वरिष्ठ संचालक रविंद्रनाथ पाटिल उपस्थित थे. यह पार्लियामेंट विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर चिकित्सा महाविद्यालय, तलेगांव दाभाड़े, पुणे और एमआईएमएसआर चिकित्सा महाविद्यालय, लातूर के सहयोग से आयोजित की जा रही है.

पार्लियामेंट का उद्घाटन 21 जनवरी की सुबह 11 बजे केंद्रीय स्वास्थ्य एवं परिवार कल्याण मंत्री डॉ. हर्षवर्धन के हाथों होगा. इसमें राज्य के चिकित्सा शिक्षा मंत्री अमित देशमुख भी उपस्थित रहेंगे. कार्यक्रम की अध्यक्षता यूनिवर्सिटी के संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड करेंगे. इस पार्लियामेंट का समापन रविवार (24 जनवरी) की शाम 6 बजे होगा. यूनिवर्सिटी के कार्याध्यक्ष राहुल कराड द्वारा पार्लियामेंट का आयोजन किया जा रहा है. जिसमें 10 सत्रों में स्वास्थ्य संबंधी चर्चा होगी.

शुभ दिन

लातूर, गुरुवार, दि.२१ जानेवारी २०२१

### एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण व संशोधनावर आधारित

# ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट आजपासून

पुणे : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट दि.२१ ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे (Pioneering Disruptive Reforms in Healthcare Ecosystem) हा या पार्लमेंटचा प्रमुख विषय आहे.

विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने हे पार्लमेंट भरविले जात आहे.

वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन गुरूवार, दि. २१ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.00 होणार आहे. या समारंभासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. हर्षवर्धन, राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, खासदार डॉ. अंबुमणी रामदास, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरचे आरोग्य मंत्री असिया नक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्मानीय अतिथि म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.

रविवार, दि. २४ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी ६.00 वा.या वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचा समारोप होणार आहे. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अश्विनी कुमार चौबे, महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे, ओरिसाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नाबा किशोर दास, खासदार भारती पवार, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे आयोजन करण्यात येत आहे.

या वर्ल्ड पार्लमेंटध्ये 10 सत्रे आयोजित केली आहेत. ती सत्रे खालीलप्रमाणे :

: कोविड-१९ आणि त्या पलीकडेः

सत्र १: कोविड-१९ मध्ये भारताचा प्रतिसादः व्हायरस पासून लसीपर्यंत

सत्र २: भारतीय आरोग्य क्षेत्रातील समस्या

: वैद्यकीय शिक्षणात सुधारणाः

सत्र ३ :वैद्यकीय शिक्षणात साथीच्या रोगांचा समावेश आणि अभ्यास क्रमातील सुधारणा

सत्र ४ : पॅरामेडिक सेवांची क्षमता आणि पोहोचमध्ये सुधारणा

सत्र ५ : आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळाचे धोरण हे आरोग्य विकासास प्रतिबंध करते



का

: संशोधन आणि नवनिर्मितीः

सत्र ६ : औषध, वैद्यकीय उपकरणे आणि उपचारांसाठी संशोधनाला प्रोत्साहन

सत्र ७ : वैद्यकीय संशोधन : जागतिक अनुभवातून शिकणे

सत्र ८ : एकात्मिक औषध संशोधन आणि आयुषची भूमिका

:आत्मनिर्भर आरोग्य यंत्रणेच्या दिशेनेः

सत्र ९ : स्वावलंबी आरोग्य प्रणालीची दिशा आणि धोरण

सत्र 10: आरोग्य क्षेत्रातील नियामक सुधारणा

या पार्लमेंटमध्ये महाराष्ट्राच्या आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. प्रदिप कुमार व्यास, पद्मश्री डॉ. शशांक जोशी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोलॉजीच्या संचालिका डॉ. प्रिया अब्राहिम, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक डॉ. सुनिल गैरोला, फोर्टीस हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल पंडित, रिलायन्स फाउंडेशनचे वैद्यकीय संल्लागार डॉ. गुसद दवेर, इंडियन एक्सप्रेसच्या वरिष्ठ संपादिका अनुराधा मस्करेन्हास, आयआय बंगलुरू चे योगा प्राध्यापक प्रतिक राज, प्रो. डॉ. गौतम सेन, डॉ. वसंत नागवेकर, पद्मभूषण डॉ. देवीशेट्टी, डॉ. पराश कोठारी, डॉ. जे.ए. जलाल, डॉ. एस.पी. कलंत्री, डॉ. जरिर उदवाडिया, डॉ. कृषव खंजर, डॉ. अमित नागपाल, डॉ. मंजिरी घराट, पद्मश्री डॉ. परवेज ग्रांट, डॉ. पराग संचेती, डॉ. सुचित्रा नागरे, डॉ. अदिती कराड, राजीव येरवडेकर, डॉ. दिलीप गोडे, ले.जनरल डॉ. एम.डी. व्यंकटेश, डॉ. कन्नन रंगरामानुजम, हिमाचल प्रदेशचे आरोग्य मंत्री डॉ. राजीव सैझल, डॉ. अरूण जामकर, डॉ.ओम श्रीवास्तव, डॉ. अजित देशपांडे, राजीव नाथ, डॉ. मृदुला बेले, डॉ. हेमंत भंसाली, शिवकुमार कुंडाले, पद्मश्री शशांक जोशी, पद्मश्री डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ. अभिजित राय चौधरी, डॉ. वाय. के. गुप्ता, डॉ. जयंत खंदारे, पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, पद्मश्री डॉ.दर्शन शंकर, आचार्य बाल कृष्णन, डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. रोहित महादेव साने, डॉ. सुरेश बी. पाटणकर, डॉ. जवाहर जे. शाह, डॉ. नितिन कर्णिक, डॉ. धनंजय केळकर, डॉ. समीर जोग, डॉ. रमेश भ्रमाल , डॉ. मोहन जोशी, डॉ लाल हिंगोरानी, संजय सिंग, अरूण खन्ना, डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. दिलीप म्हैसेकर, डॉ. रवि वानखेडकर, सुरेश शेट्टी या पार्लमेंटममध्ये विचार मांडतील.

वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटविषयी :

वैद्यकीय शिक्षण व त्यातील संशोधन समृद्ध करून व क्षमता सुधारणे. तसेच, आरोग्य सुविधा वाढवून आरोग्यसेवेतील दुरूस्ती करण्याच्या उपायांवर चर्चा करावी. ध्येय ठरविणारे आणि त्यामध्ये सक्रिय सहभाग घेणार्यांसाठी एक प्रभावी व्यासपीठ तयार करणे हे या परिषदेचे उद्दिष्ट आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्याच्या टास्क फोर्स कोविड १९ चे अध्यक्ष डॉ. संजय ओक, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. एन.टी.राव (पश्रळपश), प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, सल्लागार प्रा. डी.पी.आपटे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस.कुचेकर, व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक श्री. रविंद्रनाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सविस्तर माहितीसाठी www. worldhealthparliment.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**